Vol 5 Issue 12 Jan 2016

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

## Welcome to ISRJ

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


### Regional Editor

Dr. T. Manichander

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**


Indian Streams Research Journal
International Recognized Multidisciplinary Research Journal
ISSN No : 2230-7850 Impact Factor : 3.1560 (UIF) [Yr. 2014]

ISSN: 2230-7850 Impact Factor : 3.1560(UIF) Volume - 5 | Issue - 12 | Jan - 2016





प्रा.चांगदेव कांबळे




# भारतीय जातिसंस्था आणि अस्पृश्यतेचा उदय

प्रा.चांगदेव कांबळे
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय , पंढरपूर – जि.सोलापूर.

## प्रस्तावना :

'जाती' हा भारतीय समाज व्यवस्थेचा एक प्रमुख घटक आहे. भारतीय समाजात लहान सहान गोष्टीपासून मौलिक विचारापर्यंत आढळणाऱ्या विविधतेचे मूळ 'जाती' हेच आहे. 'जाती' ही संस्था केव्हा व कशी अस्तित्वात आली याबाबत विचारवंतात अद्याप एकमत नाही. पूर्वीच्या मानवशास्त्राच्या मते हिंदू समाजाची जातीमध्ये जी विभागणी झाली ती निरनिराळे लोक निरनिराळे धंदे करू लागल्यामुळे झाली असावी. काहींच्या मते भारतीय जातिव्यवस्था व उच्चनीच स्थान ठरविणारी जातींची चार वर्णातील विभागणी ही वंश शुध्द ठेवण्याचे जे प्रयत्न केले त्यावर आधारलेली होती. यासंबंधात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत विचारांत घेणे महत्त्वाचे ठरते. त्यांनी 'शुद्र कोण होत?' या शीर्षकाखाली लिहिलेल्या पुस्तकाच्या शेवटी पांच-सहा निष्कर्ष दिले आहेत. डॉ. आंबेडकरांच्या मते, "१. शूद्र सूर्य वंशातील आर्य जातीचे होते. २. एके काळी आर्य समाजव्यवस्थेत फक्त तीनच वर्ण होते. (ब्राह्मण, क्षत्रिय, व वैश्य). ३. शूद्राचा वेगळा वर्ण नव्हता. इंडो-आर्यन समाजात तो क्षत्रिय वर्गातच होता. ४. शूद्र राजे व ब्राह्मण यांच्यात सातत्याने झालेल्या संघर्षात ब्राह्मणांनी अनान्वित अत्याचार केले. शूद्राचा उपनयन संस्कार करण्याचे ब्राह्मणांनी नाकारले. ५. उपनयन संस्कार नाकारला गेल्याने शूद्र जे क्षत्रिय होते त्यांना कनिष्ठ दर्जा दिला गेला. प्रथम वैश्य वर्णात व नंतर चौथ्या वर्णात त्यांना ढकलण्यात आले."[१] प्राचीन हिंदू वाङ्मयात वर्णात तसा उल्लेख सांपडतो. 'जात' हा शब्द मात्र त्या वेळी अस्तित्वात नव्हता. स्मृति काळात वर्ण म्हणजे 'विशिष्ट समुच्चयातील निरनिराळ्याा जाती या बाबत बऱ्याच विचारवंतांत एकमत आढळते. केवळ एकमेकांशी लग्न संबंध ठेवणाऱ्या व एकाच प्रकारचा धंदा करणाऱ्या समुच्चयाला मिळून निराळे नाव नव्हते. वर्णामुळेच जातीचे सामाजिक स्थान दर्शविले जात होते. जातीचा इतिहास व उद्भव याबाबत प्रसिध्द समाजशास्त्रज्ञ प्रा. डॉ. धुर्ये यांचे मते, "साधारणतः वैदिक काळाशी जुळणाऱ्या सुरूवातीच्या काळात तीन वर्णांचा उल्लेख आहे, परंतु जातींचा उल्लेख नाही. त्या नंतरच्या काळात वर्ण आले. त्यावेळी इतक्या मोठ्याा संख्येने जातीही अस्तित्वात नव्हत्या. त्यानंतर जाती अस्तित्वात आल्या. अस्पृश्यतेचा शिरकाव याच काळात झालेला दिसतो. त्या काळी आंतरजातीय विवाहाविरूध्द लोकमत प्रखर नव्हते व तसे कायदेही नव्हते. हळूहळू देशपरत्वे, धंद्यापरत्वे व कौशल्यपरत्वे मोठ्याा गटातून लहान गट फुटून निघाले आणि त्या नंतरच्या शेवटच्या काळात ह्याा चिरफळ्याा झालेल्या समाजाचे अश्मीभवन होऊन असंख्य जाती निर्माण झाल्या."[२]

प्रसिध्द मानवशास्त्रज्ञ हटन यांचेही मत अशाच स्वरूपाचे आहे. त्यांच्या मते, "प्राचीन काळी या देशात अनेक वंशांचा व संस्कृतीचा जो संघर्ष व संकर झाला, त्यामधून जाती संस्थेचा उदय झाला. निरनिराळ्याा मानववंशांचा येथे झालेला संकर, मातृप्रधान

व पितृप्रधान कुटुंब पध्दतींचा संघर्ष, कारागिरांच्या श्रेणी आणि आपल्या सदस्यांवर त्यांनी घातलेले निर्बंध, छोट्याा छोट्याा सत्ताधिशांनी अमलात आणलेली भिन्न भिन्न शासकीय धोरणे, आणि पुनर्जन्म, कर्म, स्त्रीपुरूष संबंध, यज्ञयाग, सोवळेओवळे, जादूटोणा या संबंधीच्या गूढ कल्पना अशा अनेक गोष्टींचा जातीभेदाच्या उत्पत्तीला हातभार लागलेला आहे."[३] हिंदू समाजाची मूळ रचना या जातीपध्दतीवर आधारलेली आहे. आणि ही जातीपध्दत वेद, स्मृती, श्रुती, धर्मशास्त्रे आणि पुराणे यांच्या मूलाधारावर उभी आहे. या धर्मग्रंथांतून चातुर्वर्ण्यांचा उगम झाला आणि कर्मसिध्दांतासारख्या अनेक धर्मतत्त्वांच्या तात्विक चौकटीचा त्याला आधार मिळाल्यामुळे जातींना बळकटी निर्माण झाली.

हिंदू धर्मातील नीतीतत्त्वांचे हळूहळू या सर्वांवर संस्कार झाले. वेद, उपनिषदे, धर्मशास्त्रे यांचे प्रामाण्य मान्य करून हिंदू धर्मातील कर्मवाद, पुनर्जन्म, अंतीम सत्य, ब्रह्म कल्पना, मुक्ती, अंत्य संस्कार, जातीधर्म इत्यादींचा त्यांच्या मनावर चांगलाच पगडा बसला. अशा प्रकारच्या धर्म तत्त्वांचा आधार घेऊन जातिसंस्थेची उभारणी झाली व याच तत्त्वानुसार त्यातूनच निर्माण होणारी सामाजिक विषमता, अन्याय, सामाजिक श्रेणी यांचेही सातत्याने समर्थन होत आले. त्यामुळेच जातिसंस्था पक्की झाली व जन्मसिध्द ठरली. जाती-जातीतील विषमता पराकोटीला पोचली. जातिसंस्थेमुळे माणसाची किंमत गुणांवरून न ठरता ती जातीवरून ठरू लागली. कामाची विभागणी न होता काम करणारांची कायम स्वरूपाची विभागणी झाली. जातीवरून धंदा व धंद्यावरून जात ओळखण्याचा प्रघात पडला. जातीजातीचे स्वतंत्र गट निर्माण होऊन एक जात दुसऱ्या जातीपासून अलग व स्वतंत्र राहू लागली. अशा प्रकारच्या या जातीयपध्दतीच्या समाजरचनेमुळे एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीशी कसे वागावे याची शिकवण न मिळता एका जातीने दुसऱ्या जातीबरोबर कसे वागावे, कोणते नियम आणि बंधने पाळावित हे ठरले गेले. आणि शेवटी त्याचा असा परिणाम झाला की, विशिष्ट जातीस विशिष्ट रूढी, परंपरा, आचारपध्दती निर्माण झाली.

धर्मग्रंथात वरिष्ठ जातींनी कोणते हक्क, अधिकार उपभोगावेत, वापरावेत हे स्पष्ट केले आहे. त्यात कनिष्ठ जातींनी वरिष्ठ जातींची सेवा कोणत्या पध्दतीने करावी हेही स्पष्ट केले आहे.

अशा प्रकारे उच्च जातींनी हक्क व अधिकाराचे फायदे घ्यावयाचे व खालच्या जातींनी त्यांची सेवाचाकरी करण्याचा कायमचा बोजा उचलावयाचा हे स्वाभाविक ठरले गेले. जात, धंदा आणि सामाजिक प्रतिष्ठा व दर्जा पक्का झाला. त्यात बदल करता येईना. उच्च वर्णीयांना तळच्या जातींचा विटाळ होतो असे मानले जाऊ लागले. सर्वात खालच्या स्थानावर ज्या जाती होत्या त्यांचा स्पर्श किंवा सावलीदेखील वरच्या जातींनी वर्ज्य ठरविली. वरच्या सत्ताधीश जातींनी खालच्या जातींना खालच्या दर्जाची कामे करण्यास भाग पाडून त्यांच्यावर अशुध्दतेचा छाप मारला. त्यातूनच अस्पृश्यता उदयाला आली असावी. स्वाभाविकपणे वरिष्ठ जाती स्पृश्य व कनिष्ठ जाती अस्पृश्य म्हणून ठरल्या गेल्या व त्यांच्यावर अस्पृश्यतेचा कायमचा शिक्का मारून त्यांना अस्पृश्य, अतिशूद्र, चांडाळ, अंत्यज, नीच म्हणून बाजूला टाकले गेले. त्यांच्या वाट्याला हलकी आणि कमी प्रतीची कामे आली. ती करण्याचे दंडकही त्यांच्यावर लादले गेले. अस्पृश्य वर्ग हिंदू समाजातील ह्या दैनंदिन जीवनामुळे सामाजिक दृष्ट्याा समाजात हीन ठरला, तो आर्थिकदृष्ट्याा दरिद्री, गुलाम झाला. आर्थिक व सांस्कृतिक प्रगतीची संधि त्याला कधी लाभली नाही. शिक्षण आणि संस्कृतीची दारे त्याला बंद झाली. त्यामुळे त्याच्या जीवनातला जिवंतपणा पार निघून गेला. त्याच्या ठिकाणी स्वाभिमान, महत्त्वाकांक्षा उरली नाही. "अस्पृश्य हा माणूस असून देखील त्याला माणुसकीचे हक्क मिळाले नाहीत, माणूस असून माणसांपासून त्याला दूर राहावे लागले, त्याची सावली देखील उच्च वर्णीयांनी अंगावर पडू दिली नाही. दलित म्हणून ते कायमचेच दुर्दैवी ठरले. त्यांच्या नशिबी अजन्म अपमानीत, पराभूत, अन्याय्य जीवन जगणे आले. शूद्र कीटकाप्रमाणे गलिच्छपणांत जगण्याची व दुःख दारिद्र्याात पिचण्याची शतकानुशतके त्यांच्यावर सक्ती झाली."[४] आणि हे सारे सामाजिकतेच्या आणि धार्मिकतेच्या नावाखाली होत गेले, हे विसरून चालणार नाही. असे शंकरराव खरातांनी म्हटले आहे ते अगदी यथार्थ आहे.

### *संदर्भ टीपा*

१.बी. आर. आंबेडकर : हू वेअर दि शूद्राज, ठाकूर ॲण्ड कंपनी, लि. मुंबई, १९४७, पान २३९.
२.जी. एस. घुर्ये : कॉस्ट, क्लास ॲण्ड ॲक्युपेशन, पॉप्यलर प्रकाशन, मुंबई, पान ४३.
३.जे. एच. हटन : कॉस्ट इन इंडिया, केंब्रीज युनिर्व्हसिटी प्रेस, पान १६५.
४.शंकरराव खरात : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर, ठोकळ प्रकाशन, पुणे, पान २.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org